# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 02/12/2022 (शुक्रवार) सकाळ

---

## घरफोडी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील भुगाव शेत शिवार मौदा येथे दिनांक ३०/११/२०२२ चे १८.३० वा. ते दिनांक ०१/१२/२०२२ चे ०५.३० वा. चे दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे— अजय पुष्पराज चिमनकर, वय २७ वर्ष, रा. वडोदा याच्या शेतातील घराचे टिनाच्या दरवाज्याची कुंडी तोडुन आत प्रवेश करून ७ क्विंटल कापुस किमती अंदाजे ५६०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर, मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील रबडीवाला वाय पॉइंट एन. एच. ५३ रोड येथे दिनांक ०१/१२/२०२२ चे १४.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— राजहंस किसन वाघमारे, वय २८ वर्ष, रा. चिकना रा. कुही, जि. नागपूर हा आपली पत्नी नामे— प्रांजली वाघमारे, वय २२ वर्ष, ०३ महिन्याची मुलगी नामे— पार्थवी व आई नामे— सौ. अंजना वाघमारे, वय ४५ वर्ष यांना सोबत घेवुन आपली मोटरसायकल पॅशन प्रो. क्र. MH-40/CV-२९२६ ने परमात्मा एक आश्रम येथे दर्शन करण्यास चिकना गावावरून नागपुर ते भंडारा रोडने मौदा कडे जाण्यासाठी दुपारी ०२.१५ वा. दरम्यान रबडीवाला वाय पॉइंट एन. एच. ५३ रोड जवळ भंडाराकडुन येणारा आरोपी ट्रक क्र. GJ-12-BX-3423 च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटरसायकलला समोरून जोरदार धडक मारून अपघात करून फिर्यादीची पत्नी व मुलगी यांचे मरणास व फिर्यादी व त्यांची आई हिला जखमी करण्यास आरोपी ट्रक चालक कारणीभतु ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी ट्रक चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी ट्रक चालकाचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक खराबे पोलीस स्टेशन मौदा मो. क्र. ९८२३४३८३५५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर